**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ लातूर विभाग, लातूर**

**(शिकाऊ उमेदवारांसाठी प्रशिक्षणार्थी म्हणुन निवड करण्याबाबत)**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, लातूर विभाग, लातूर मध्ये सन २०२२-२३ सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवार (प्रशिक्षणार्थी) म्हणुन ५२ पदे ऑनलाईन पध्दतीने पद / जागा निश्चित करण्यात आले असुन त्यानुसार एकुण ५० जागा (यांत्रिक मोटारगाडी (एमएमव्ही) - ३६, विजतंत्री (ईलेक्ट्रीशियन) - ०५, सांधाता (वेल्डर) (गॅस अॅन्ड ईलेक्ट्रीकल) - ०१, मोटारगाडी साठाजोडारी (एमव्हीबीबी) (शिट मेटल वर्क्स) ०७, पेन्टर - ०१, अभियांत्रिकी पदवीधर/पदविका-०२ अशी (एकुण - ५२) जागा / पदे भरावयाची आहेत. वर दर्शविण्यात आलेल्या व्यवसायातील आय टी आय उत्तीर्ण उमेदवारांनी सर्वप्रथम **MIS** वेब पोर्टलवरील **www.apprenticeship.gov.in** या वेबसाईटवर दि. **११.०७.२०२२** ते **३१.०७.२०२२** वेळ **११.००** वाजेपर्यंत ऑनलाईन रेजिस्ट्रेशन करून **MSRTC Division Latur** या आस्थापने (Establishment) करीता ऑनलाईन अप्लाय करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे ऑनलाईन रेजिस्ट्रेशन केलेल्या शिकाऊ उमेदवारीकरीता इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज भरण्याची तारीख दिनांक ०१.०८.२०२२ ते ०४.०८.२०२२ वेळ १५.०० वाजेपर्यंत करण्यात आली आहे. सदरचे छापील अर्ज रा. प. विभागीय कार्यालय, जुना रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड, लातूर (आस्थापना शाखा) येथे दि. ०१.०८.२०२२ ते ०४.०८.२०२२ रोजी वेळ १५.०० वाजेपर्यंत शनिवार व सुट्टीचे दिवस वगळुन मिळतील व लगेच स्विकारले जातील. सदरहु अर्जाची किंमत (GST १८% सहित) खुल्या प्रवर्गाकरीता रूपये ५९०/- व मागासवर्गीयांसाठी रूपये २९५/- आहे. त्याप्रमाणे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **MSRTC Fund Account Latur** या नावाने रू. ५९०/- चा व मागासवर्गीय उमेदवारांनी रू. २९५/- चा धनाकर्ष किंवा आय.पी.ओ. (इंडियन पोस्टल ऑर्डर) अर्ज घेतेवेळी सोबत आणणे आवश्यक आहे. दि. ११.०७.२०२२ पुर्वी व दि. ३१.०७.२०२२ रोजी वेळ ११.०० नंतर ऑनलाईन रेजिस्ट्रेशन केलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही व ते रद्द समजले जातील व त्यांना या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज देण्यात येणार नाही. जे उमेदवार दि. ०४.०८.२०२२ रोजी वेळ १५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाचे विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणार नाहीत त्यांचा शिकाऊ उमेदवार भरतीसाठी विचार केला जाणार नाही.

विभाग नियंत्रक,
रा. प. लातूर